

सायं दैनिक
नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ५४ • गुरुवार दि.१९ नोव्हेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

दादर रेल्वे नव्हे,मेट्रो स्थानकाचे होणार 'चैत्यभूमी' नामकरण!



सरकारच्या घोषणेत घोळ; रेल्वे स्थानकासंदर्भातील ट्विट डिलीट केल्याने संभ्रम

मुंबई/प्रतिनिधी-अनेक वर्षांपासून दादर रेल्वे स्थानकाचे नामकरण चैत्यभूमी होणार अशी चर्चा आहे. अशामध्ये बुधवारी राज्य सरकारच्या आदेशानुसार, दादर रेल्वे स्थानकाचे नाव चैत्यभूमी करणार असल्याचे समोर आले. पण, गुरुवारी सकाळी (१९ नोव्हेंबर) सीएमओ महाराष्ट्रच्या ट्वीटरवर दादर रेल्वे स्टेशनचे नव्हे तर दादर मेट्रो स्थानकाचे नाव चैत्यभूमी करणार असल्याचे सरकारने स्पष्ट केले.

दरम्यान, महाराष्ट्र डीजीआयपीआरने आधी केलेले दादर रेल्वे स्थानकासंदर्भातील ट्विट काही तासांनी काढून टाकण्यात आले. दादर स्टेशनचे नाव बदलणार असल्याचे मुंबईत चांगलीच चर्चा सुरु झाली आहे. अशामध्ये नावाचा गोंधळ झाल्याने अनेक सवाल उपस्थित होत आहेत. यावर राज्य सरकार काय खुलासा करते? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

बुधवारी (१८ नोव्हेंबर) डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी येथील तयारीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत आढावा घेण्यात आला. यावेळी सरकारकडून एक प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आले. यामध्ये, दादर रेल्वे स्थानकाला चैत्यभूमी हे नाव देण्यास राज्य शासनाने यापूर्वीच तत्वतः मान्यता दिली असून, केंद्र शासनाकडून प्राप्त मार्गदर्शनानुसार विधानमंडळाच्या समितीशी संबंधित आवश्यक प्रक्रियेची पूर्तता विधीमंडळ अधिवेशनात करून नामकरणाची कार्यवाही करण्यात येईल. असे सांगण्यात आले होते. दरम्यान, काही तासांनी सोशल मीडियावरून काही तासांनी दादर रेल्वे स्थानकाच्या नामांतरणा संबंधित ट्विट डिलीट करण्यात आले. त्यामुळे अनेक सवाल उपस्थित करण्यात येत आहे.

दादर रेल्वे स्थानकाचे नाव बदलणार या मुख्यमंत्री फडणवीसांच्या घोषणेनंतर मुंबईत अनेक प्रतिक्रिया उमटल्या. यावेळी मनसेचे मुंबईतील प्रभाग क्रमांक १९२ चे नगरसेवक यशवंत किल्लेदार यांनी दादर स्थानकाच्या नामकरणाला तीव्र विरोध केला आहे. स्थानिक दादरकरांना विश्वासात न घेता किंवा त्यांचे मत विचारात न घेता हा निर्णय घेण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. बाहेरील लोकांची मागणी दादरकरांवर थोपवून दादरची ऐतिहासिक ओळख पुसण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे त्यांनी सांगितले. तेच दुसरीकडे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने दहिसरमध्ये जल्लोष केला. ढोल वाजवत फटके फोडत त्यांनी जल्लोष केला. राज्य सरकारतर्फे सीएमओ महाराष्ट्र या ट्विटरवर जारी केलेल्या आदेशात दादर मेट्रो स्थानकाच्या नामकरणाची प्रक्रिया अधिवेशनात अशा शीर्षकाखाली रेल्वे स्थानकाचे नव्हे तर मेट्रो स्थानकाचे नाव बदलण्यात आले आहे. दादर मेट्रो स्थानकाला चैत्यभूमी नाव देण्याच्या मागणीसंदर्भात राज्य सरकारने यापूर्वीच तत्वतः मान्यता देऊन केंद्र सरकारला पत्र पाठवले आहे. मात्र, या प्रक्रियेसाठी विधानमंडळाच्या **पान ४ वर**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड



पंढरपूर:राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हेलिकॉप्टरमध्ये बिघाड झाला आहे. हेलिकॉप्टर बिघडल्यानं प्रशासनाची तारांबळ उडाली होती. हेलिकॉप्टरच्या बॅटरीचा अचानक प्रॉब्लेम झाल्यानं एकनाथ शिंदे बराच वेळ हेलिपॅडवर थांबले होते. हेलिकॉप्टरच्या बॅटरीचा प्रॉब्लेम झाल्यानं ते सुरु होऊ शकलं नाही. यामुळं एकनाथ शिंदे यांच्यासोबत अनेक अधिकारी देखील हेलिपॅड परिसरात उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ज्या हेलिकॉप्टरनं प्रवास करणार होते ते सुरु न झाल्यानं त्यांना किमान २० मिनिटं हेलिपॅडवर थांबले होते. संबंधित हेलिकॉप्टर एअर इंडियाचं असल्याची शक्यता आहे. हेलिकॉप्टरची बॅटरी बदलण्यासाठी पाठवण्यात आल्याची माहिती आहे. दुसरी बॅटरी आल्यानंतर हेलिकॉप्टर सुरु होण्याची शक्यता असल्याचं सांगितलं जातंय. अखेर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे रस्ते मार्गे सोलापूरला **पान ४ वर**



हिंदू हृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो शिवसेना शिंदे गटाच्या प्रवक्त्या शायना एनसी यांनी फाडल्याच्या निषेधार्थ ठाकरेसेनेच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या समोर आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात प्रकाश मारावार, मनोज यादव, गजानन हरकरे, स.नवज्योतसिंग गाडीवाले, नितीन सरोदे, तुलसीदास नंदाने, स.जीतुसिंघ टाक, अशोक पावडे व इतर सहभागी झाले होते.

चिखलीतांड्यात वाघाचा पुन्हा हल्ला;शेतकऱ्याच्या गोऱ्ह्याला केले ठार



पैनगंगा अभयारण्य परिसरात वाघाची दहशत

किनवट/प्रतिनिधी-बोधडी बु. वनपरिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या चिखलीतांडा येथे बुधवारी (१८ नोव्हेंबर) रात्री वाघाने दुसऱ्यांदा केलेल्या हल्ल्यात शेतकऱ्याचा दोन वर्षीय गोऱ्हा ठार झाला आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, अभयारण्य प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

चिखलीतांडा येथील शेतकरी सुभाष जाधव यांचा दोन वर्षीय गोऱ्हा नेहमीप्रमाणे रात्री शेतात बांधलेला होता. १८ नोव्हेंबर रोजी दुपारी त्या गोऱ्ह्यावर हल्ला केला होता. त्यात तो गंभीर जखमी झाला. त्याच दिवशी मध्यरात्रीच्या सुमारास दबा धरून बसलेल्या वाघाने दुसऱ्यांदा गोऱ्ह्यावर झडप घालून जागीच ठार केले. या घटनेची माहिती मिळताच वनपरिक्षेत्राधिकारी चंद्रकांत पोकुलवार यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. हल्ला करणारा प्राणी वाघ आहे की बिबट्या, याची निश्चिती करण्यासाठी वन विभागाने परिसरात 'ट्रॅप कॅमेरे' बसवले असून, शुक्रवारी सकाळपर्यंत याबाबतचे चित्र स्पष्ट होणार असल्याचे सांगण्यात आले.

दरसांगवी परिसर पुन्हा वाघाच्या रडारवर

१७ ऑक्टोबर रोजी शनिवारपेठ-मदनापूर परिसरातील रेल्वे ट्रॅकवर एका पट्टेदार वाघाचा दुर्दैवी मृत्यू झाल्यानंतरही पैनगंगा अभयारण्य प्रशासनाने कसलाही बोध घेतलेला नाही म्हणून गेल्या काही दिवसांपासून ५ नोव्हेंबर रोजी येंदा शिवारात, तर ६ नोव्हेंबर रोजी शनिवारपेठ शिवारात वाघाने शेतकऱ्यांच्या जनावरांवर हल्ले केले होते. त्यानंतर आता पुन्हा चिखलीतांडा येथेही १८ नोव्हेंबर रोजी घटना घडली आहे. वारंवार होणाऱ्या या हल्ल्यांमुळे बळीराजा आर्थिक संकटात सापडला आहे. पैनगंगा अभयारण्य प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनाचा आणि निष्काळजीपणाचा फटका बोधडी वनपरिक्षेत्रातील शेतकऱ्यांना बसत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. अभयारण्य प्रशासनाने तातडीने या वाघाचा बंदोबस्त करावा आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्याला त्वरित आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

सोनिया गांधींचे पुस्तक मी नक्की वाचणार-खा.अशोक चव्हाण

लातूर: काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांनी त्यांच्या आयुष्यात अनेक चढउतार पाहिले आहेत. मी बराचकाळ काँग्रेसमध्ये काम केले आहे. काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांच्या बिलाँगिंग : अ जर्नी ऑफ लव्ह या आत्मचरित्रात नेमके काय लिहिले आहे याची उत्सुकता मलापण आहे. मी हे पुस्तक नक्की वाचणार अशी प्रतिक्रिया राज्याचे माजी मुख्यमंत्री व भाजपचे विद्यमान खा.अशोक चव्हाण यांनी व्यक्त केली आहे.



सोनिया गांधी यांच्या पुस्तकातील कथनावरून राजकीय वर्तुळात चर्चा सुरू असतानाच शिवसेनेच्या प्रवक्त्यांनी पुस्तक फाडल्याची घटना घडली. याबाबत अशोक चव्हाण यांना विचारले असता, आपण पूर्वी काँग्रेसमध्ये होतो. त्यामुळे सोनिया गांधी यांनी लिहिलेले पुस्तक नक्की वाचणार आहोत. त्यांनी राजकीय आणि वैयक्तिक आयुष्यात अनेक चढउतार अनुभवले आहेत. त्याचे कथन या पुस्तकात केले आहे. त्यामुळे त्या काळात नेमके काय घडले, हे आपल्यालाही समजले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. पुस्तक फाडण्याच्या कृतीबाबत विचारले असता, प्रत्येकाचा पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा असतो, अशी मोजकी प्रतिक्रिया चव्हाण यांनी दिली.दरम्यान, माजी मंत्री अमित देशमुख यांनी टिपू सुलतान यांचे विचार पुढील पिढीत रुजविण्यासाठी सर्वतोपरी मदत करणार असल्याचे विधान केले होते. या विधानावरही अशोक चव्हाण यांनी निशाणा साधला. टिपू सुलतान हा विषय अमित देशमुख यांच्या कक्षेबाहेरचा आहे. कोणतीही योजना राबविण्यापूर्वी त्यांचे सरकार सत्तेवर यावे लागेल. टिपू सुलतान यांचे विचार नेमके काय आहेत, याची अमित देशमुख यांना माहिती आहे की नाही, हेच माहीत नसल्याचा टोला चव्हाण यांनी लगावला. सोनिया गांधी यांच्या पुस्तकावरून सुरू झालेला वाद आता सावरकर, टिपू सुलतान आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या मुद्द्यांपर्यंत पोहोचला आहे. या प्रकरणावरून महायुती आणि काँग्रेसमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू झाले असून, आगामी काळात हा वाद आणखी चिघळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



माहूरच्या पाणीप्रश्नासाठी यवतमाळ जिल्हा प्रशासनाकडे नगराध्यक्षांची धाव

वेणी धरणातून पैनगंगा नदीपात्रात पाणी सोडण्याची मागणी



माहूर/प्रतिनिधी-माहूर शहरासह लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री रेणुका माता मंदिर परिसरातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न गंभीर बनण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अत्यल्प पर्जन्यमान आणि धनोडा बंधाऱ्याच्या सुरू असलेल्या कामामुळे पैनगंगा नदीपात्रातील पाणीसाठा कमी होत असल्याने आगामी काळात पाणीटंचाईचे संकट गडद होण्याची चिन्हे आहेत. या पार्श्वभूमीवर माहूरचे नगराध्यक्ष फिरोज कादर दोसानी यांनी पाणीप्रश्नाच्या तातडीच्या उपाययोजनेसाठी थेट यवतमाळ जिल्हा प्रशासनाकडे धाव घेतली आहे.

माहूर शहराचा तसेच श्री रेणुका माता मंदिर परिसराचा पाणीपुरवठा प्रामुख्याने पैनगंगा नदीवर अवलंबून आहे. मात्र, यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने आणि धनोडा बंधाऱ्याच्या कामामुळे नदीपात्रात पाण्याची कमतरता निर्माण झाली आहे. याचा परिणाम शहरातील नागरिकांसह मंदिर परिसरात येणाऱ्या लाखो भाविकांच्या पाणीपुरवठ्यावर होण्याची शक्यता आहे.या गंभीर परिस्थितीची दखल घेत नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी यवतमाळचे जिल्हाधिकारी विकास मीना यांना नगरपंचायत माहूरच्या वतीने निवेदन सादर केले. वेणी धरणातून पैनगंगा **पान ४ वर**

पुस्तकाच्या पानांवर राजकारण

लोकशाही व्यवस्थेत प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा, एखाद्या पुस्तकाला विरोध करण्याचा किंवा त्यावर बंदी घालण्याची मागणी करण्याचा अधिकार आहे. मात्र, विरोध व्यक्त करण्याच्या पद्धतीतही लोकशाही मूल्यांचे भान असणे आवश्यक आहे. वैचारिक मतभेद असू शकतात, राजकीय भूमिका वेगवेगळ्या असू शकतात; परंतु त्यातून सार्वजनिक जीवनात असभ्यतेचे आणि सूडाच्या राजकारणाचे प्रदर्शन होऊ लागले, तर लोकशाहीच्या निकोप वातावरणाला बाधा पोहोचते. काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांच्या आत्मचरित्राच्या निमित्ताने महाराष्ट्रात निर्माण झालेला वाद याच प्रवृत्तीचे दर्शन घडविणारा आहे. सोनिया गांधी यांच्या आत्मचरित्राच्या प्रकाशनानंतर या पुस्तकाला वाचकांचा मोठा प्रतिसाद मिळत असल्याचा दावा काँग्रेसकडून केला जात आहे. मात्र, पुस्तकातील मजकूर, त्यातील विचार आणि मांडणी यावर चर्चा होण्याऐवजी त्याच्या निमित्ताने राजकीय संघर्षाला तोंड फुटले आहे. पुस्तकावर बंदी घालण्याची मागणी करणे हा एक भाग असू शकतो; परंतु बंदीची मागणी करताना पुस्तकाच्या प्रतींची पाने फाडणे, त्यातील छायाचित्रांची विटंबना करणे आणि त्यातून राजकीय विरोधकांना डिवचण्याचा प्रयत्न करणे हा लोकशाहीतील विरोधाचा मार्ग निश्चितच असू शकत नाही. विशेष म्हणजे, राज्यात सत्तेचे भागीदार असलेल्या शिवसेनेच्या शिंदे गटाकडून या पुस्तकाच्या विरोधात आंदोलन करण्यात आले. या आंदोलनादरम्यान पुस्तकाची पाने फाडण्यात आल्याचा प्रकार समोर आला. त्यात उद्धव ठाकरे यांचे छायाचित्र असलेल्या पानाचीही विटंबना करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. एवढेच नव्हे, तर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे छायाचित्र असलेले पान फाडल्याचा आरोपही होत आहे. हा प्रकार खरा असेल, तर बाळासाहेबांच्या विचारांवर चालण्याचा दावा करणाऱ्यांनी त्यांच्या छायाचित्राचाच अपमान केल्याचा विरोधाभास निर्माण होतो. राजकीय विरोधकांना लक्ष्य करण्याच्या नादात आपण नेमके काय करीत आहोत, याचे भानही राहू नये, ही चिंतेची बाब आहे. या प्रकारानंतर ठाकरे गटाकडून प्रत्युत्तर देण्यात आले, तर काँग्रेसनेही या कृतीवर आक्षेप घेत आरोप केले. परिणामी, मूळ पुस्तकातील आशय मागे पडून कोण कुणाचे पान फाडते, कोण कुणाला प्रत्युत्तर देते आणि कोण कुणाचा अपमान करते, याभोवतीच राजकीय चर्चा फिरू लागली. पुस्तकावर बंदी घालण्याची मागणी आणि त्यासाठी आंदोलन करण्याची कृती यामध्ये मोठे अंतर आहे. बंदीची मागणी करायची असेल, तर त्यामागील कारणे जनतेसमोर मांडता येतात. पुस्तकातील आक्षेपार्ह वाटणाऱ्या मजकुरावर तथ्यांच्या आधारे टीका करता येते. न्यायालयीन किंवा घटनात्मक मार्गांचाही अवलंब करता येतो. मात्र, पुस्तकाची पाने फाडून विचारांना उत्तर देता येत नाही. उलट अशा कृतीतून विरोधकांच्या भूमिकेला अधिक प्रसिद्धी मिळण्याची शक्यता असते. महाराष्ट्रासमोर आज यापेक्षा कितीतरी गंभीर प्रश्न उभे आहेत. राज्यातील अनेक भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण होत आहे. मराठवाड्यासह विविध भागांमध्ये पाणीटंचाई, शेतीसाठी पाण्याची उपलब्धता, पिण्याच्या पाण्याचे नियोजन, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी गंभीर होत आहेत. मागील काही वर्षांत कधी अतिवृष्टी, कधी अवकाळी पाऊस, तर कधी पावसाच्या अनियमिततेमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. आता पुढील काळात पाणीटंचाईचे संकट अधिक तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत शासनाने जलसंधारण, पाणीवाटपाचे नियोजन, टँकरची उपलब्धता, चारा छावण्या, पिकांच्या नुकसानीचे मूल्यांकन आणि शेतकऱ्यांना दिलासा देणाऱ्या उपाययोजनांवर लक्ष केंद्रित करणे अपेक्षित आहे. सत्ताधारी पक्षावर या संकटाची जबाबदारी अधिक आहे. कारण सत्ता ही केवळ राजकीय वर्चस्व गाजविण्यासाठी नसते, तर जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी असते. विरोधी पक्षांचीही जबाबदारी तितकीच महत्त्वाची आहे. त्यांनी केवळ सत्ताधाऱ्यांच्या प्रत्येक कृतीला विरोध करण्याऐवजी जनतेच्या प्रश्नांवर ठोस पर्याय मांडले पाहिजेत. दुष्काळी परिस्थितीवर सर्वपक्षीय बैठक घेणे, पाणीटंचाईवर दीर्घकालीन उपाययोजना सुचविणे आणि शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी एकत्र येणे ही आजची खरी गरज आहे.मात्र, दुर्दैवाने राज्यातील राजकीय वातावरण जनतेच्या प्रश्नांपेक्षा वैयक्तिक आरोप-प्रत्यारोप, पुस्तकांची पाने फाडणे, छायाचित्रांची विटंबना आणि एकमेकांना कमी लेखण्याच्या स्पर्धेत अडकलेले दिसते. राजकीय नेत्यांच्या या वर्तनामुळे सामान्य माणसाच्या मनात लोकप्रतिनिधींच्या प्राधान्यक्रमाबद्दल प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे.पुस्तकातील विचार पटत नसतील, तर त्याला विचारांनी उत्तर द्यावे. बंदीची मागणी करायची असेल, तर त्यासाठी घटनात्मक मार्गाचा अवलंब करावा. मात्र, पुस्तकांच्या पानांवर राजकारण करताना जनतेच्या आयुष्यातील प्रश्नांची पाने कोरीच राहू देऊ नयेत. कारण राजकीय पक्षांच्या संघर्षातून कुणाची सत्ता टिकेल किंवा कुणाची प्रतिमा उंचावेल, हे काळच ठरवेल; पण पाण्याविना होरपळणाऱ्या शेतकऱ्याला आणि तहानलेल्या गावाला त्याचा काहीही उपयोग होणार नाही. आज महाराष्ट्राला पुस्तकांची पाने फाडणारे राजकारण नको, तर जनतेच्या प्रश्नांवर उपाययोजनांची नवी पाने लिहिणारे नेतृत्व हवे आहे. राजकीय पक्षांनी हे वेळीच ओळखले नाही, तर जनतेचा संयमच त्यांच्या राजकारणाला योग्य उत्तर देईल.

स्वच्छ शौचालय, सन्मानाचे भविष्य; ग्रामीण स्वच्छतेला नवी दिशा

स्वच्छता ही केवळ आरोग्याची गरज नाही, तर ती मानवी प्रतिष्ठा, सुरक्षितता आणि समानतेचा मूलभूत आधार आहे. प्रत्येक व्यक्तीला स्वच्छ आणि सुरक्षित शौचालयाची सुविधा मिळणे हा सन्मानाने जगण्याच्या अधिकाराचाच एक भाग आहे. विशेषतः महिला आणि मुलींना शौचालयाच्या अभावामुळे असुरक्षिततेचा सामना करावा लागू नये, त्यांच्या आरोग्यावर परिणाम होऊ नये आणि त्यांना कोणत्याही संकोचाशिवाय शौचालयाचा वापर करता यावा, ही काळाची गरज आहे. याच विचारातून स्वच्छ शौचालय-गरिमामय भविष्य ही संकल्पना पुढे आली आहे.

गरिमामय भविष्य म्हणजे नेमके काय? तर गरिमा म्हणजे मानवी प्रतिष्ठा, सन्मान व आत्मप्रतिष्ठा. प्रत्येक व्यक्तीला अपमान, असुरक्षितता किंवा मूलभूत सुविधांच्या अभावामुळे होणाऱ्या गैरसोयींशिवाय सन्मानाने जगता यावे, असे भविष्य म्हणजे गरिमामय भविष्य होय. त्यामुळे स्वच्छ शौचालय म्हणजे केवळ एक सुविधा नसून महिलांचा सन्मान, मुलांची सुरक्षितता आणि प्रत्येक नागरिकाच्या आरोग्याची हमी आहे. जागतिक शौचालय दिनाचे औचित्य साधून १९ नोव्हेंबर ते १० डिसेंबर २०२६ या कालावधीत हे विशेष अभियान राबविण्यात येत आहे. संयुक्त राष्ट्र संघाने यंदाच्या जागतिक शौचालय दिनासाठी सुरक्षित शौचालये, समान भविष्य ही संकल्पना निश्चित केली आहे. ग्रामीण स्वच्छतेला शाश्वत स्वरूप देण्यासोबतच स्वच्छता आणि सामाजिक समानता यांचा संबंध अधोरेखित करणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

स्वच्छ भारत मिशनच्या माध्यमातून ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर शौचालयांची उभारणी करण्यात आली आहे. मात्र, केवळ शौचालय बांधणे पुरेसे नसून त्यांचा नियमित वापर, स्वच्छता, देखभाल आणि सुरक्षितता सुनिश्चित करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. या अभियानांतर्गत ग्रामीण भागातील सार्वजनिक, सामुदायिक तसेच शाळा आणि अंगणवाड्यांमधील शौचालयांची स्थिती तपासण्यात येणार आहे. पाण्याची उपलब्धता, स्वच्छता, सुरक्षितता आणि वापरण्यायोग्यता यांचे परीक्षण करून आवश्यक दुरुस्ती व सुधारणा करण्यावर भर दिला जाणार आहे. महिला, विद्यार्थिनी आणि दिव्यांग व्यक्तींना सुलभपणे वापरता येतील अशा सुविधांना प्राधान्य दिले जाईल. वैयक्तिक



घरगुती शौचालयांच्या तांत्रिक स्थितीचेही मूल्यांकन करण्यात येणार आहे. आवश्यकतेनुसार एक खड्डा शौचालयाचे दोन खड्ड्यांच्या शौचालयात रूपांतर, तसेच सोकपिट नसलेल्या सेप्टिक टँकचे सोकपिटयुक्त व्यवस्थेत अद्ययावतीकरण करण्यावर भर राहणार आहे. शौचालयांमधील मैला गाळाचे सुरक्षित संकलन, वाहतूक आणि शास्त्रोक्त विल्हेवाट याबाबतही जनजागृती केली जाणार आहे.

मिलिंद व्यवहारे
नांदेड.

स्वच्छतेचे संस्कार बालपणापासून रुजावेत, यासाठी शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सहभागातून जनजागृती उपक्रम आणि शाळा स्वच्छता परीक्षण आयोजित केले जाणार आहे. तसेच उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायती, सार्वजनिक स्वच्छता संकुले आणि वैयक्तिक घरगुती शौचालयांसाठी स्पर्धा घेण्यात येणार आहेत. १० डिसेंबर रोजी मानवाधिकार दिनाचे औचित्य साधून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा गौरव केला जाणार आहे. स्वच्छतेची चळवळ यशस्वी करण्यासाठी केवळ प्रशासनाचे प्रयत्न पुरेसे नाहीत. ग्रामपंचायती, महिला बचतगट, शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. नांदेड जिल्ह्यातही हे अभियान प्रभावीपणे राबविण्यात येणार असून नागरिकांनी या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी केले आहे. प्रत्येक घरात शौचालय असणे, प्रत्येक शौचालय स्वच्छ व वापरण्यायोग्य असणे आणि प्रत्येक नागरिकाला सुरक्षिततेने त्याचा वापर करता येणे, हेच या अभियानाचे खरे यश आहे. स्वच्छतेची जबाबदारी केवळ प्रशासनाची नसून ती प्रत्येक नागरिकाची आहे. लोकसहभागातून स्वच्छ, सुरक्षित आणि आरोग्यदायी गावे निर्माण झाली, तरच स्वच्छ शौचालय - गरिमामय भविष्य या संकल्पनेला खऱ्या अर्थाने मूर्त स्वरूप प्राप्त होईल.

पाणी वाचवा, माणसं वाचवा!

पाणी हा केवळ नैसर्गिक स्रोत नाही, तर मानवी जीवनाचा मूलभूत आधार आहे. पाण्याशिवाय माणूस, शेती, पशुधन आणि संपूर्ण सजीवसृष्टीचे अस्तित्वच धोक्यात येते. त्यामुळे पाण्याचे नियोजन करताना सर्वप्रथम मानवी जीवनाचा विचार होणे आवश्यक आहे. आज राज्यातील अनेक भागांमध्ये उपलब्ध पाण्याच्या साठ्यावरून रब्बी हंगामासाठी सिंचनाचे नियोजन सुरू आहे. शेतकऱ्यांना पाणी देण्याच्या घोषणा होत आहेत. धरणांमधून पाणी सोडण्याचे निर्णय घेतले जात आहेत. मात्र, या निर्णयांमागे आगामी सात ते आठ महिन्यांत निर्माण होणाऱ्या भीषण पाणीटंचाईचा गांभीर्याने विचार केला जात आहे का? हा खरा प्रश्न आहे.पुढील काही महिन्यांत पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना दाही दिशा भटकावे लागण्याची शक्यता आजच दिसत असताना केवळ रब्बी पिकांच्या सिंचनाला प्राधान्य देणे कितपत योग्य आहे? भविष्यात पाणीटंचाई निर्माण होणार आहे, हे सांगण्यासाठी कोणत्याही ज्योतिषाची किंवा भविष्यवेत्त्याची गरज नाही. आजचे पर्जन्यमान, धरणांमधील पाणीसाठा, भूजल पातळी आणि पाण्याचा वाढता वापर यांचा अभ्यास केला, तरी उद्याचे संकट स्पष्टपणे दिसून येते. तरीही शासन आणि प्रशासनाला या संकटाची जाणीव होत नसेल, तर ही चिंतेची बाब आहे.



धरणांमध्ये उपलब्ध असलेले पाणी अमर्याद नाही. एकदा धरणातून पाणी सोडले की त्याची भरपाई लगेच होणार नाही. पावसाळा संपल्यानंतर उन्हाळ्यापर्यंत उपलब्ध साठाच नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा आधार असतो. त्यामुळे पाणीवाटप करताना सर्वप्रथम पिण्याच्या पाण्याचे आरक्षण निश्चित केले पाहिजे. त्यानंतरच शेती, उद्योग आणि अन्य वापरासाठी पाण्याचे नियोजन व्हायला हवे.शेतीला पाणी देणे निश्चितच महत्त्वाचे आहे. शेतकरी हा अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्याच्या पिकांना पाणी मिळाले पाहिजे. मात्र, पिके वाचवताना माणसांचे जगणेच धोक्यात येणार असेल, तर अशा नियोजनाचा फेरविचार करणे गरजेचे आहे. कारण पिण्यासाठी पाणी नसेल, तर नागरिकांचे जीवन कसे चालणार? गावोगावी टँकरने पाणीपुरवठा करावा लागला, शहरांमध्ये आठ-दहा दिवसांनी पाणी मिळू लागले आणि नागरिकांना पाण्यासाठी रांगा लावाव्या लागल्या, तर त्याची जबाबदारी कोण घेणार? आज धरणांमध्ये पाणी आहे म्हणून राजकीय नेते आणि प्रशासनाकडून आश्वासने दिली जात आहेत. मात्र, उद्या पाणी संपल्यानंतर हीच मंडळी नागरिकांच्या प्रश्नांना काय उत्तर देणार? पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांचा संताप वाढला, तर त्यांना सामोरे जाण्याची तयारी प्रशासनाने ठेवली आहे का? आज घेतलेले निर्णय उद्याच्या संकटाला आमंत्रण देणारे ठरू नयेत, एवढीच अपेक्षा आहे. महाराष्ट्रातील पाणीप्रश्न हा नवीन नाही. मराठवाडा, विदर्भ आणि राज्यातील दुष्काळी भागांना दरवर्षी पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. काही भागांमध्ये अतिवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण होते, तर दुसरीकडे पावसाअभावी शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होतो. एका भागात पाणी वाहून जाते, तर दुसऱ्या भागात नागरिक पाण्याच्या थेंबासाठी संघर्ष करतात. ही परिस्थिती बदलण्यासाठी नदीजोड प्रकल्प, जलसंधारण आणि पाणी पुनर्वापराच्या योजनांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.नदीजोड प्रकल्पाबाबत अनेक वर्षांपासून चर्चा सुरू आहे. पावसाळ्यात वाहून जाणारे अतिरिक्त पाणी योग्य नियोजनाद्वारे दुष्काळी भागांकडे वळविण्याची संकल्पना अत्यंत महत्त्वाची आहे. मात्र, या प्रकल्पांच्या घोषणा करण्यापलीकडे प्रत्यक्ष काम किती झाले? किती प्रकल्पांना मंजुरी मिळाली? किती निधी उपलब्ध झाला? किती कामे पूर्ण झाली? याचा हिशेब जनतेसमोर मांडला जात नाही.प्रत्येक वर्षी पावसाळा आला की जलसंधारणाच्या घोषणा होतात. उन्हाळा आला की टँकरच्या नियोजनाच्या बैठका होतात. निवडणुका आल्या की पाणीप्रश्नावर आश्वासने दिली जातात. मात्र, कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या बाबतीत अपेक्षित गती दिसत नाही. पाणीटंचाईवर तात्पुरते उपाय करण्यापेक्षा दीर्घकालीन उपाययोजनांची अंमलबजावणी करणे ही काळाची गरज आहे.पाणीटंचाई निर्माण झाली की सर्वप्रथम टँकरची मागणी वाढते. त्यानंतर टँकर पुरवठ्याचे कंत्राट, विहिरींचे अधिग्रहण, पाण्याची वाहतूक आणि त्यासाठी होणारा खर्च यांचे गणित सुरू होते. अशा परिस्थितीत काही ठिकाणी टँकर माफियांचे फावते, अशी नागरिकांची तक्रार आहे. पाणीटंचाई ही काही घटकांसाठी कमाईची संधी ठरू नये.

टँकरवर कोट्यवधी रुपये खर्च झाल्याच्या नोंदी असतात; मात्र प्रत्यक्षात किती नागरिकांना किती पाणी मिळाले, किती टँकर फेऱ्या झाल्या आणि किती खर्च झाला, याचा पारदर्शक हिशेब जनतेला मिळायला हवा. टँकर पुरवठ्याच्या नावाखाली गैरव्यवहार होत असल्यास त्याची चौकशी झाली पाहिजे. पाण्याच्या नावाखाली सार्वजनिक निधीची लूट होऊ नये, यासाठी कठोर नियंत्रण आवश्यक आहे.दरवर्षी नवीन विहिरी खोदल्या जातात, नवीन हातपंप बसवले जातात आणि पाणीपुरवठ्याच्या योजनांवर खर्च दाखवला जातो. मात्र, आधी बसवलेले हातपंप कुठे गेले? जुन्या विहिरींची अवस्था काय आहे? त्या बंद का पडल्या? त्यांची दुरुस्ती का केली जात नाही? नवीन कामांवरच वारंवार निधी खर्च करण्याऐवजी जुन्या योजनांची देखभाल का केली जात नाही? या प्रश्नांची उत्तरे मिळाली पाहिजेत.नवीन विहिरी, हातपंप आणि टँकर यांच्यावर दरवर्षी खर्च होत असेल, तर त्यातून कायमस्वरूपी पाणीपुरवठा का निर्माण होत नाही? सरकारी निधीचा विनियोग नेमका कुठे होतो, याची सार्वजनिक तपासणी झाली पाहिजे. पाणीटंचाईच्या नावाखाली कोणाचे आर्थिक हितसंबंध जोपासले जात असतील, तर ते थांबवणे सरकारचे कर्तव्य आहे.शहरांमध्ये पाणीपुरवठ्याची जबाबदारी महानगरपालिका आणि संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांची असते. मात्र, अनेक ठिकाणी पाणीपुरवठ्याचे नियोजन अपुरे असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक, पाण्याच्या टाक्यांची क्षमता, जलवाहिन्यांची दुरुस्ती, गळती रोखणे, पाण्याचे समान वितरण आणि भविष्यातील वाढती लोकसंख्या या सर्व बाबींचा विचार करून नियोजन करणे अपेक्षित आहे.



दत्तोपंत डहाळे
नांदेड.

नागरिकांनी वारंवार निवेदने दिली, तक्रारी केल्या, संबंधित अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या, तरीही त्याचा परिणाम दिसत नसेल तर प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी यांनी जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. केवळ मोठ्या नेत्यांच्या आदेशांची वाट पाहत बसून चालणार नाही. स्थानिक पातळीवर निर्णय घेण्याची आणि त्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित पदाधिकाऱ्यांची आहे.'राजा सांगे दळ हले' या मानसिकतेतून प्रशासन बाहेर आले पाहिजे. जनतेच्या प्रश्नांवर स्वतंत्रपणे विचार करून निर्णय घेण्याची क्षमता प्रशासनात असणे आवश्यक आहे. पाण्यासारख्या जीवनावश्यक प्रश्नावर राजकीय दबाव किंवा वरिष्ठांच्या आदेशांची वाट पाहणे ही नागरिकांशी अन्याय करणारी बाब आहे.आज राजकीय पक्ष, नेते आणि लोकप्रतिनिधी विविध विषयांवर एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करताना दिसतात. सत्तासंघर्ष, पक्षांतर्गत वाद, राजकीय कुरघोड्या आणि कौटुंबिक राजकारणाला प्रसारमाध्यमांमध्ये मोठी प्रसिद्धी मिळते. मात्र, महाराष्ट्रासमोरील पाणीटंचाईसारख्या मूलभूत प्रश्नांना अपेक्षित महत्त्व दिले जाते का? हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.एका कुटुंबातील राजकीय घडामोडी, नेत्यांची वक्तव्ये आणि सत्तेतील बदल यांना दिवसभर प्रसिद्धी दिली जाते; पण भविष्यातील पाणीटंचाई, नदीजोड प्रकल्प, भूजल पातळीतील घट आणि पिण्याच्या पाण्याचे आरक्षण यावर व्यापक चर्चा होताना दिसत नाही. राजकीय घडामोडींना प्रसिद्धी मिळू नये, असे नाही. मात्र, महाराष्ट्राच्या भविष्याशी निगडित प्रश्नांनाही तेवढेच महत्त्व मिळाले पाहिजे.सरकार कोणत्याही पक्षाचे असो, पाणीप्रश्न हा राजकारणापलीकडचा विषय आहे. सत्ताधारी आणि विरोधकांनी एकत्र येऊन राज्याच्या जलव्यवस्थापनाचा आराखडा तयार केला पाहिजे. केवळ निवडणुकीच्या काळात पाणीप्रश्नावर बोलून उपयोग नाही. प्रत्यक्ष काम, निधीचे नियोजन आणि अंमलबजावणी यांचा हिशेब जनतेसमोर ठेवला पाहिजे.आगामी काळातील संकट टाळायचे असेल, तर सरकारने तातडीने काही महत्त्वाचे निर्णय घेणे आवश्यक आहे. सर्वप्रथम राज्यातील प्रमुख धरणांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचा वस्तुनिष्ठ आढावा घेऊन पिण्याच्या पाण्याचे आरक्षण निश्चित करावे. त्यानंतरच रब्बी हंगामासाठी सिंचनाचे नियोजन करावे. पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात. शहरांमधील गळती, अनधिकृत जोडण्या आणि पाण्याचा अनावश्यक वापर थांबवावा.गावागावांमध्ये पावसाचे पाणी साठविण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने जलसंधारणाची कामे करावीत. तलाव, बंधारे, नाले आणि पारंपरिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करावे. भूजल पातळी वाढविण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवाव्यात. नवीन विहिरी खोदण्याबरोबरच जुन्या विहिरी आणि हातपंपांची दुरुस्ती करावी. टँकरच्या खर्चावर नियंत्रण ठेवून त्याची माहिती सार्वजनिक करावी.तसेच नदीजोड प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी कालबद्ध कार्यक्रम जाहीर करावा. प्रत्येक प्रकल्पाची सद्यस्थिती, खर्च, निधी आणि कामाची प्रगती नागरिकांसमोर मांडावी. केवळ घोषणा करून जनतेची दिशाभूल करू नये. आज पाणी आहे म्हणून उद्याची चिंता करू नये, अशी भूमिका घेणे धोकादायक ठरेल. पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर सरकार किती ठिकाणी टँकर पाठवणार? किती गावांना पाणीपुरवठा करणार? शहरातील प्रत्येक वस्तीत पाणी कसे पोहोचवणार? पाणीटंचाईमुळे निर्माण होणारे सामाजिक संघर्ष कसे थांबवणार? या प्रश्नांची उत्तरे आजच शोधली पाहिजेत.पाणी मिळाले नाही की गावागावांत वाद निर्माण होतात. वस्त्यांमध्ये संघर्ष होतो. शेतकरी, नागरिक आणि प्रशासन यांच्यात तणाव वाढतो. पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना मैलोनमैल पायपीट करावी लागते. विद्यार्थ्यांचे शिक्षण, नागरिकांचे आरोग्य आणि दैनंदिन जीवन विस्कळीत होते. अशा परिस्थितीत सरकारने दिलेली आश्वासने नागरिकांच्या संतापापुढे निष्प्रभ ठरतात.म्हणूनच सरकारने आणि स्थानिक प्रशासनाने ज्येष्ठ नागरिक, जलतज्ज्ञ, पर्यावरण अभ्यासक, कृषी तज्ज्ञ आणि अनुभवी सामाजिक कार्यकर्त्यांचे मार्गदर्शन घ्यावे. त्यांच्या अनुभवाचा उपयोग करून दीर्घकालीन जलव्यवस्थापनाचे धोरण तयार करावे. राजकीय स्वार्थापेक्षा जनहिताला प्राधान्य द्यावे.आजचा निर्णय उद्याच्या पिढ्यांचे भविष्य ठरवणार आहे. पाणी वाचविणे म्हणजे केवळ पाण्याचा थेंब वाचविणे नव्हे, तर माणसांचे जीवन, शेती आणि संपूर्ण पर्यावरण वाचविणे होय. त्यामुळे पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देऊनच पाणीवाटपाचे नियोजन झाले पाहिजे.

सरकारने नागरिकांना पोकळ आश्वासने देण्याऐवजी ठोस कृती करावी. नदीजोड प्रकल्पांना गती द्यावी, जलसंधारणाची कामे प्रभावीपणे राबवावीत आणि पाणीपुरवठ्यातील गैरव्यवहारांना आळा घालावा. अन्यथा आजच्या निष्काळजीपणाची मोठी किंमत उद्याच्या पिढीला मोजावी लागेल.पाणीटंचाईचे संकट दारात उभे असताना राजकारणाच्या घोषणांत रमण्यापेक्षा पाण्याचे नियोजन करण्याची वेळ आली आहे. कारण पाणी नसेल तर सत्ता, संपत्ती आणि राजकारण यापैकी कशालाही अर्थ उरणार नाही. पाणी वाचवा, माणसं वाचवा! ही केवळ घोषणा नसून महाराष्ट्राच्या भविष्यासाठीची अत्यंत निकडीची हाक आहे.

सायं दैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

हदगाव शहरात नियोजन न करताच नको त्या ठिकाणी नागरी विकास कामे...!



नगरसेवकांची मात्र हाताची घडी तोंडावर बोट कशासाठी?

शेख चांदपाशा

हदगांव:हदगाव शहरात सुरू असलेल्या विविध नागरी विकासकामांबाबत यापूर्वीही वर्तमानपत्रांच्या माध्यमातून वेळोवेळी आवाज उठविण्यात आला आहे. शहरात सर्व सामान्य नागरिकांच्या प्रभागात नागरिक सुविधा आवश्यक असताना जेथे रोड नाली आवश्यक आहे तेथे दुर्लक्ष नको. नको त्या ठिकाणी लाखो रुपयांची कामे करण्यात येत असल्याने हदगाव नागरिकांच्या नशिबी हाच का विकास?, असा संतप्त सवाल नागरिक करताना दिसून येत आहेत. मात्र नगराध्यक्षा, उपनगराध्यक्ष, नगरसेवक आणि संबंधित यंत्रणा या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष का देत नाहीत?, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

शहरात कोणतेही शासकीय अथवा सार्वजनिक निधीतून होणारे विकासकाम असो, त्या कामाची संपूर्ण माहिती नागरिकांना मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. कामाचे नाव, मंजूर निधी, कामाची मुदत, संबंधित कँन्राटदाराचे नाव आणि कामाची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यांची माहिती दर्शविणारा फलक लावणे अपेक्षित असताना शहरातील बहुतांश विकासकामांच्या ठिकाणी असे फलक दिसून येत नाहीत.विशेष म्हणजे, ज्या काही ठिकाणी विकासकामांचे माहिती फलक लावण्यात आले आहेत, त्यांनाही झाकून ठेवण्यात आले आहे. हे फलक झाकून ठेवण्यामागचे नेमके कारण काय? सदर फलक कोणत्या विकास कामाचे आहेत, हे मात्र समजू शकले नाही. नागरिकांना विकासकामांची माहिती मिळू नये, अशी काही भूमिका आहे का? की यामागे दुसरे काही कारण आहे? हा प्रश्न अनुत्तरित आहे.विकासकामे जनतेच्या पैशातून होतात, मग त्यांची माहिती जनतेपासून लपविण्याची गरज काय.विकास म्हणजे केवळ रस्ते, नाल्या, गटारे आणि सिमेंट रोड नाली काँक्रिटची कामे नव्हेत, तर त्यामध्ये योग्य नियोजन, दर्जा, पारदर्शकता आणि नागरिकांची विश्वासार्हता असणेही तितकेच महत्त्वाचे आहे.हदगाव नगरपरिषद प्रशासनाने या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देऊन सर्व विकासकामांच्या ठिकाणी माहिती फलक स्पष्टपणे लावावेत, झाकून ठेवलेले फलक खुले करावेत आणि प्रत्येक कामाची माहिती नागरिकांसाठी उपलब्ध करून द्यावी. कारण विकासकामे कोणाच्या वैयक्तिक पैशातून नव्हे, तर जनतेच्या पैशातून होतात. त्यामुळे जनतेला प्रश्न विचारण्याचा आणि माहिती जाणून घेण्याचा पूर्ण अधिकार आहे.हदगाव शहराच्या विकासासाठी आवाज उठवणे ही प्रत्येक जागरूक नागरिकाची सामाजिक जबाबदारी आहे. मात्र हदगाव शहरात अन्याय सहन करण्याची सवय दिवसेंदिवस वाढत आहे. हदगाव शहरात कोर्टाची रोड, जिल्हा परिषद शाळेच्या संरक्षक भिंतीची सिमेंट नाली रोड या नालीचा आऊटलेट कुठे काढलेला आहे, या वरून शहराचा विकास कसा होत आहे याची प्रचिती येत आहे. सध्या शासनाकडून आलेल्या निधीची कशी विल्हेवाट लावायची हे या परिस्थितीवरून शहरात दिसून येत आहे. शहरात काही ठिकाणी सिमेंट रोडचे काम करणारा सदर कँन्राटदार बड्या राजकीय वजनादार नेत्याशी संबधीत असल्याने या कँन्राटदाराच्या मनमानीला नगरपालिकेने लगाम लगाम लावायला हवा होता. ते काम होत नसल्याने न.पा.प्रशासन जबाबदारी झटकून टाकत आहे. कोट्यावधीचे काम सार्वजनिक बांधकाम उपविभाग हदगाव मार्फत होत असल्याने 'तेरी भी चूप मेरी भी चुप' अशी भूमिका निवडून दिलेल्या नगरसेवकांची असल्याने नागरी विकासाच्या दृष्टीने सर्व काही अलबेल असल्याचे दिसून येत आहे.

बारावी व दहावीच्या परीक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहीर

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ लातूर, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, पुणे, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक व कोकण यांच्यामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या इयत्ता बारावीच्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र व इयत्ता दहावीच्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.विद्यार्थी,पालक व संबंधित शाळा-महाविद्यालयांनी परीक्षेच्या वेळापत्रकाची नोंद घ्यावी,असे आवाहन मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

मंडळाने प्रसिद्ध केलेल्या अधिकृत परिपत्रकानुसार परीक्षांचे लेखी व प्रात्यक्षिक परीक्षांचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे.इयत्ता बारावी लेखी परीक्षा : सोमवार ८ फेब्रुवारी ते गुरूवार १८ मार्च २०२७. प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन : बुधवार २० जानेवारी ते शनिवार ६ फेब्रुवारी २०२७.इयत्ता दहावी लेखी परीक्षा : सोमवार १५ फेब्रुवारी ते १५ मार्च २०२७. प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन : गुरूवार २८ जानेवारी ते शनिवार १३ फेब्रुवारी परीक्षांचे सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे. मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे छापील स्वरुपात देण्यात येणार वेळापत्रक हे अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरुनच परीक्षेच्या तारखांची खात्री करुन घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ट व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉटसप किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरु नये. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

अपर जिल्हाधिकारी कार्यालयात २६ रोजी म.ज्योतिराव फुले महसूल लोक अदालत

प्रलंबित महसुली प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्याची संधी

नांदेड/प्रतिनिधी-महसूल प्रशासनातील प्रलंबित अर्धन्यायिक महसुली प्रकरणांचा आपसी संमतीने आणि तडजोडीद्वारे जलदगतीने निपटारा करण्यासाठी अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या कार्यालयात गुरुवार, दि. २६ नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजता महात्मा ज्योतिराव फुले महसूल लोक अदालत आयोजित करण्यात आली आहे. या लोक अदालतीच्या माध्यमातून पक्षकारांना आपली प्रलंबित प्रकरणे तडजोडीने कायमस्वरूपी निकाली काढण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून महसूल व वन विभागाच्या १४ ऑगस्ट रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यात १ सप्टेंबर ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत हे अभियान राबविण्यात येत आहे. महसूल प्रशासनातील अपर जिल्हाधिकारी यांच्या अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये जमिनीशी संबंधित अनेक महसुली दावे व अपिले वर्षानुवर्षे प्रलंबित असतात. त्यामुळे पक्षकारांचा वेळ आणि पैसा खर्च होतो. ही प्रकरणे परस्पर संमतीने जलदगतीने निकाली काढणे तसेच न्यायालयांवरील प्रलंबित प्रकरणांचा भार कमी करणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.या लोक अदालतीमध्ये अपर जिल्हाधिकारी यांच्या अर्धन्यायिक न्यायालयात प्रलंबित असलेल्या सर्व प्रकारच्या महसुली दाव्यांचा व अपिलांचा समावेश असेल. संबंधित पक्षकारांनी दोन्ही पक्षांच्या संमतीने किंवा वकिलांमार्फत विहित नमुन्यातील प्रपत्र-अ मध्ये तडजोडनामा अर्ज संबंधित न्यायालयात सादर करावा. प्राप्त अर्जांची छाननी करून दोन्ही पक्षांची संमती निश्चित केली जाईल आणि कायदेशीर तडजोडनामा तयार करण्यात येईल. त्यानंतर २६ नोव्हेंबर रोजी आयोजित लोक अदालतीमध्ये सहमतीने अंतिम आदेश पारित करून पात्र प्रकरणे निकाली काढण्यात येतील.नांदेड जिल्ह्यातील संबंधित पक्षकारांनी आपल्या प्रलंबित महसुली प्रकरणांचा तडजोडीने कायमस्वरूपी निपटारा करून घेण्यासाठी या विशेष लोक अदालतीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

उस्मानशाही मील चालू करण्याचा महिलांचा मेळाव्यात निर्धार

नांदेड/प्रतिनिधी-उस्मानशाही मील संवर्धन समितीच्या वतीने जागरण सप्ताह निमित्त महात्मा फुले स्मारकाजवळ मील चालू करण्यासाठी महिलांचा मेळावा घेण्यात आला.



सदर महिला मेळाव्याचे उद्घाटन सौ. संगीता विठ्ठल पाटील डक संचालक नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँक यांच्या हस्ते झाले. तर अध्यक्ष सौ. रेखा चव्हाण पाटील प्रदेश महासचिव काँग्रेस कमिटी महाराष्ट्र या होत्या. प्रमुख पाहुणे नगरसेविका राजश्री गोडबोले, मंगल साखरे, संगीता साबळे, शिवनंदा देशमुख, सुरेखा वैद्य, नसीमा पठाण या होत्या. याप्रसंगी संगीता विठ्ठल पाटील डक यांनी सर्व पक्ष नेत्यांनी आपले हेवे दावे बाजूला सारून उस्मानशाही मील चालू करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. तर सौ. रेखा चव्हाण पाटील यांनी नांदेड शहराला गत वैभव निर्माण करण्यासाठी तमाम महिलांनी आपली शक्ती पणाला लावली पाहिजे. यावेळी इतर महिलांनी आपले मौलिक विचार मांडले. समन्वयक शाम निलंगेकर यांनी मार्गदर्शन केले. या महिला मेळाव्यात उस्मानशाही मिल चालू करण्यासाठी महिलांनी पक्का निर्धार केला. महिला मेळाव्याचे संयोजन शेख. शकीला मॅडम, ललिता कुंभार, ॲड.नगमा सिद्दीकी, तरन्नुम मोहम्मद, शिल्पा सुभाष लोखंडे, रुचिका निलंगेकर यांनी उत्तमरीच्या केले. मेळाव्याचे प्रास्ताविक श्याम निलंगेकर यांनी केले. सुत्रसंचालन शेख शकीला मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन सौ. ललिता कुंभार यांनी केले.

बळीरामपूर येथील जुगार अड्ड्यावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-बळीरामपूर येथील वडारगल्ली भागात सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर नांदेड ग्रामीण पोलीसांनी मंगळवारी सायंकाळी धाड टाकुन पाच जणांना अटक केली आहे.

वडारगल्ली भागातील बाभळीच्या झाडाजवळ जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती नांदेड ग्रामीण पोलीसांना मिळाली. पोलीस निरिक्षक अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी पाटील, फौजदार चव्हाण व पोलीस कर्मचाऱ्यांनी मंगळवारी सायंकाळी जुगार अड्ड्यावर धाड टाकली. पैसे लावून तिर्रट नावाचा जुगार खेळत असतांना गंगाराम कडाजी वाघमारे (वय ५२) रा.बळीरामपूर, बालाजी भीमराव चव्हाण (वय ५०) रा.बळीरामपूर, सचिन उत्तम पवळे (वय २९) रा.जानापूरी, चिरंजीव संभाजी पाईकराव (वय ३३), कृष्णा साईनाथ जाधव (वय २४) रा.बळीरामपूर यांना अटक केली. पोलीसांनी घटनास्थळावरुन चार दुचाकी, चार मोबाईल व रोख रक्कम असा ३ लाख १६ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला आहे. याप्रकरणी पाच जणांविरुध्द नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात मुंबई जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माहूर येथील १९ कोटींच्या व्यापारी संकुलाबाबत आ.केराम यांचा पुढाकार

माहूर/प्रतिनिधी-शहराच्या विकासाला गती देतानाच वर्षानुवर्षे व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या हिताशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा ठाम निर्धार आ.भीमराव केराम यांनी व्यक्त केला. प्रस्तावित व्यापारी संकुलाच्या उभारणीत व्यापाऱ्यांवर अन्याय होऊ देणार नाही, तर विकास आणि व्यापाऱ्यांचे हित यांचा योग्य समन्वय साधूनच प्रकल्पाची अंमलबजावणी केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. व्यापाऱ्यांच्या अडचणी समजून घेत त्यांच्या मागण्यांबाबत प्रशासनाला आवश्यक त्या सूचना देत आ.केराम यांनी या प्रश्नात सक्रिय पुढाकार घेतला आहे.

स्थानिक शासकीय विश्रामगृहात सोमवार, दि.१६ नोव्हेंबर रोजी दुपारी व्यापारी संकुलामुळे बाधित होणाऱ्या व्यापाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक आ.भीमराव केराम यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी विवेक कांदे, भाजप शहराध्यक्ष तथा नगरसेवक गोपू महामुने, ॲड. रमण जायभाये, अनिल वाघमारे आणि नगर अभियंता रोहित डुकरे उपस्थित होते. माहूर शहरातील सराफा ओळ व परिसराचा कायापालट करण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारच्या भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष साहाय्य योजनेअंतर्गत तब्बल १९ कोटी ७६ लाख रुपयांचा भव्य व्यापारी संकुल प्रकल्प प्रस्तावित आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची निविदा प्रक्रिया १४ नोव्हेंबर रोजी पूर्ण झाली आहे. मात्र, या विकासकामामुळे अनेक वर्षांपासून याच परिसरात व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. ही बाब गांभीर्याने लक्षात घेत आ.केराम यांनी व्यापाऱ्यांना विश्वासात घेऊन त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. बैठकीत व्यापाऱ्यांनी बाधित व्यापाऱ्यांनाही प्रस्तावित संकुलात गाळे उपलब्ध करून द्यावेत, प्रत्येकाकडून समान व निश्चित अनामत रक्कम आकारावी, गाळ्यांचे भाडे निश्चित करावे, बांधकाम कालावधीत पर्यायी व्यवसायाची व्यवस्था करावी आणि गाळेवाटप प्रक्रिया पारदर्शकपणे राबवावी, अशा मागण्या मांडल्या.व्यापाऱ्यांच्या या मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेत आ.भीमराव केराम यांनी बैठकीपूर्वीच संबंधित अधिकाऱ्यांकडून संपूर्ण प्रकल्पाची माहिती घेतली.

स्वारातीम विद्यापीठात इंदिरा गांधी यांना अभिवादन

नांदेड/प्रतिनिधी-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात गुरुवार, दि.१९ नोव्हेंबर रोजी भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. राष्ट्रीय एकात्मता दिनाचे औचित्य साधून विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षात आयोजित कार्यक्रमात प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी उपस्थित प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ दिली. देशाची एकता, अखंडता आणि बंधुभाव जपण्यासोबतच राष्ट्रीय एकात्मतेच्या मूल्यांचे संवर्धन करण्याचा संकल्प या शपथेतून व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांसह प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी कुंदा पाटील, सुनील जाधव, धर्मापुरी कोंका, केशव कल्याणकर, उद्धव हंबर्डे, शिवाजी चांदणे, नारायण गोरे, सुरेश देशमुख, संतोष हंबर्डे, दादाराव हंबर्डे, गोपीराज हंबर्डे यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

नांदेड-बिदर रेल्वे मार्गासाठी आ.श्रीजया चव्हाण यांचे कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांना साकडे


नांदेड/प्रतिनिधी-बंगळुरू येथे सुरू असलेल्या कॉमनवेल्थ महिला संसद सदस्य परिषदेच्या निमित्ताने भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्रीजया चव्हाण यांनी कर्नाटकचे मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांची भेट घेऊन नांदेड-बिदर रेल्वे मार्गाला कर्नाटक राज्य सरकारने मंजुरी द्यावी, असे साकडे घातले.

या परिषदेत सहभागी झालेल्या महाराष्ट्राच्या प्रतिनिधी मंडळात आ. श्रीजया चव्हाण यांचा समावेश आहे. यानिमित्ताने त्यांना कर्नाटकचे मुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांनी स्नेहभोजनासाठी निमंत्रित केले होते. याप्रसंगी झालेल्या चर्चेत आ. चव्हाण यांनी नांदेड-बिदर या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला कर्नाटक राज्य सरकारकडून आवश्यक असलेल्या परवानग्या आणि प्रकल्पातील त्यांच्या हिस्स्याच्या खर्चास मंजुरी द्यावी, अशी मागणी केली. नांदेड-बिदर रेल्वे मार्गाला केंद्र सरकारने मान्यता दिली असून, केंद्र व राज्य सरकारच्या ५०-५० टक्के आर्थिक सहभागातून हा प्रकल्प उभारला जाणार आहे. त्यानुसार महाराष्ट्रातील भाजपा महायुती सरकारने या प्रकल्पास मान्यता देऊन आपल्या वाटचाचा खर्च उचलण्याबाबतचा शासन निर्णयही निर्गमित केला आहे. मात्र, अद्याप कर्नाटक राज्य सरकारने संबंधित अनुमती दिलेली नसल्याने प्रकल्प रेंगाळला आहे. या प्रकल्पाला कर्नाटक राज्य सरकारने मंजुरी द्यावी, यासाठी राज्याचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी संसदेसह कर्नाटक शासनाकडे पाठपुरावा केला आहे. मात्र, अद्यापही त्यावर निर्णय झालेला नाही. नांदेड व बिदर ही शीख समाजाची दोन महत्त्वपूर्ण तीर्थस्थळे या प्रकल्पाने जोडली जाणार आहेत. त्यामुळे याबाबत लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी मागणी आ. श्रीजया चव्हाण यांनी मुख्यमंत्री डी.के.शिवकुमार यांच्याकडे केली. त्यावर लवकरच विचार करू, असे आश्वासन शिवकुमार यांनी दिल्याचे आ. चव्हाण यांनी म्हटले आहे.



नांदेडमध्ये २१ नोव्हेंबरला स्त्री शक्ती विस्तार मेळावा

नांदेड/प्रतिनिधी-महिलांना एकत्र आणून त्यांच्यात संवाद, स्नेहभाव आणि परस्पर सहकार्याची भावना वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने ज्ञान प्रबोधिनीतर्फेनांदेडमध्ये २१ नोव्हेंबर रोजी स्त्री शक्ती विस्तार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. अशोकनगर येथील सावरकर प्रतिष्ठान येथे सकाळी ११ वाजता हा मेळावा पार पडणार आहे.



महिलांसाठी आयोजित या मेळाव्यात परिचय, संवाद, मैत्री आणि खेळ अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दैनंदिन कामकाजाच्या व्यापातून बाहेर पडून महिलांना एकमेकींशी संवाद साधता यावा, विचारांची देवाणघेवाण करता यावी तसेच नवीन मैत्रीचे संबंध निर्माण व्हावेत, या हेतूने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. महिलांच्या एकत्रीकरणातून परस्पर विश्वास, आत्मीयता आणि सामाजिक बांधिलकी अधिक दृढ करण्यावर या मेळाव्यात भर दिला जाणार आहे. केवळ औपचारिक कार्यक्रम न ठेवता सहभागी महिलांना मोकळेपणाने व्यक्त होण्यासाठी आणि एकमेकींशी जोडले जाण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा आयोजकांचा प्रयत्न आहे.या मेळाव्यात नांदेड शहरातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन ज्ञान प्रबोधिनीतर्फेकरण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी अपर्णा कुलकर्णी यांच्याशी ९८८१५०९५८८ या क्रमांकावर संपर्क साधावा.

देगलूरमध्ये गांजाचा नशा करणाऱ्या तिन जणांना पोलिसांनी पकडले

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर शहरात अमली पदार्थांच्या सेवनांचे प्रकार सुरू असल्याचे समोर येत असतानाच देगलूर पोलिसांच्या डीबी पथकाने गांजा ओढणाऱ्या विरुद्ध एकाच दिवशी तीन स्वतंत्र कारवाया केल्या आहेत. भायेगाव रोड परिसरातील लेंडी नदी पुला जवळील परिसरातील निर्जन ठिकाणी गांजा ओढताना तीन तरुणांना पोलिसांनी रंगेहात पकडले.

१६ नोव्हेंबर रोजी भायेगाव रोडवरील लेंडी नदी पुलाच्या परिसरात डीबी पथकाने या कारवाया केल्या. पहिल्या कारवाईत सोमवारी दुपारी बांबूच्या झाडाजवळ आकाश सोनटक्के (२२, रा. शारदानगर देगलूर) याच्याकडून गांजा ने भरलेली अर्धवट जळालेली सिगारेट, किंमत अंदाजे ५० रुपये जप्त करण्यात आली. दुसऱ्या कारवाईत दुपारी लेंडी नदी पुलाखाली लक्ष्मीकांत कांबळे (२३, रा. एकतानगर, भायगाव रोड, देगलूर) यांच्याकडूनही गांजा ने भरलेली अर्धवट जळालेली सिगारेट किंमत ५० रुपये, जप्त करण्यात आली. तिसऱ्या कारवाईत दुपारी दरम्यान लेंडी नदी पुलाजवळील बाभळीच्या झुडपात पियुष गायकवाड (५१,रा.गीतानगर, भायगाव रोड, देगलूर) यांच्याकडूनही ५० रुपये किमतीची गांजने भरलेली अर्धवट जळालेली सिगारेट जप्त करण्यात आली. या तिन्ही प्रकरणात देगलूर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

बारा सराईत गुन्हेगारांवर हद्दपारीची कारवाई

नांदेड/प्रतिनिधी-गुन्हेगारांच्या तीन टोळीतील बारा जणांवर पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांनी हद्दपारीची कारवाई केली आहे.

नांदेड शहर व जिल्ह्यातील गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांनी अभिलेखावरील सराईत गुन्हेगार व वारंवार गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांची माहिती संकलीत करुन टू प्लस योजने अंतर्गत सदरील गुन्हेगारांवर हद्दपारी व स्थानबद्ध करण्याचे प्रस्ताव तयार करुन कारवाईचे सत्र सुरु केले आहे. भाग्यनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत सराईत गुन्हेगार शिला सुनील भदरगे (वय ४२) रा.बेलानगर,नांदेड, इंदुबाई मुंजाजी बाऱ्हाटे (वय ३५) रा.संतोषनगर, नांदेड, हनमंत मारोती कांबळे (वय २०) रा.पालीनगर, नांदेड, रेखा आनंद पुरी (वय ३५) रा.विजयनगर,नांदेड, सुनीता रमाकांत सोनकांबळे (वय ४०) रा.सप्तगिरी,नांदेड या गुन्हेगारांनी संगनमत करुन फोन द्वारे नागरिकांना कामाचे अमिष दाखवून बोलवून घेणे, मारहाण करणे, अंगावरील कपडे काढून व्हिडीओ शुटींग करुन ते व्हॉयरल करण्याची तसेच खोट्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी देवून लाखो रुपयांची खंडणी उकळत असत. जबरदस्तीने दागिणे व पैसे लुटने व घरात घुसून जबरी चोरी करणे अशा प्रकारे गंभीर स्वरुपाचे चार गुन्हे दाखल आहेत. वरील पाचही आरोपींना पोलीस अधीक्षकांनी सहा महिन्यांसाठी नांदेड जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. तसेच चोरी व घरफोडी करणाऱ्या गुन्हेगारांच्या टोळीतील अर्जुन पुरुषोत्तम मोरे (वय २८) रा. मरघाट,नांदेड, सोहेल अब्दुल सत्तार (वय १९) रा.जवाहरनगर, नांदेड, प्रदीपकुमार विरेंद्रकुमार कोरी (वय २०) रा.बळीरामपूर, आशा हरीचंद्र तेलंग (वय ५५) रा. शाहूनगर, शेख नईम शेख मोईनोद्दीन (वय २१) रा. कैलाशनगर या पाच जणांना नांदेड जिल्ह्यातून एका वर्षासाठी हद्दपार करण्यात आले आहे. या गुन्हेगारांच्या टोळीवर भाग्यनगर पोलीस स्टेशनमध्ये चोरी व घरफोडीचे पाच गुन्हे दाखल आहेत. धर्माबाद पोलीस स्टेशनमध्ये गोवंशांची तस्करी करणाऱ्या अजिम गौसोद्दीन खुरेशी (वय ४०) रा.करखेली व दत्ता किशन सिलगिरे (वय ३८) रा.करखेली या दोघांना सहा महिन्यांसाठी नांदेड जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. या दोन्ही गुन्हेगारांवर गोवंशांची तस्करी प्रकरणी तीन गुन्हे दाखल आहेत.

संभाव्य पाणी टंचाई परिस्थिती लक्षात घेवून प्रशासनाने आतापासून ठोस नियोजन करावे-आ.केराम

पाणी टंचाई आढावा बैठकीत प्रशासनाला सुचना



किनवट/प्रतिनिधी-यावर्षीच्या पावसाळ्यात पावसाचे प्रमाण अगदी नगण्य झाल्यामुळे पाणी टंचाईच्या झळा आतापासूनच नागरिकांना सोसाव्या लागत आहेत. स्थानिक ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागाच्या तुघलकी कारभाराची वस्तुस्थिती टंचाई आराखडा बैठकीमुळे चव्हाट्यावर आली आहे. संभाव्य टंचाई परिस्थिती लक्षात घेऊन प्रशासनाने आतापासूनच ठोस नियोजन करून प्रभावी अंमलबजावणीच्या आ.भीमराव केराम यांनी सूचना दिल्या.

किनवट तालुक्यातील जानेवारी ते मार्च आणि एप्रिल ते जून २०२७ या कालावधीतील संभाव्य पाणीटंचाई निवारण कृती आराखडा तयार करण्याच्या अनुषंगाने किनवट पंचायत समितीच्या वतीने श्रीसाई मंदिरात आ.भीमराव केराम यांच्या अध्यक्षतेखाली पाणी टंचाई आढावा बैठक पार पडली. बैठकीत तालुक्यातील संभाव्य टंचाईग्रस्त गावे, वाड्या-वस्त्या, पिण्याच्या पाण्याचे उपलब्ध स्रोत, विहिरी, विंधन विहिरी आणि हातपंपांची सद्यस्थिती यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. आ. केराम यांनी गावनिहाय पाणीटंचाईची परिस्थिती जाणून घेतली व आवश्यक उपाययोजनांबाबत सूचना दिल्या.

नादुरुस्त हातपंपांची तातडीने दुरुस्ती करा

गावातील नादुरुस्त हातपंप तातडीने दुरुस्त करणे, आवश्यक ठिकाणी नवीन विंधन विहिरी घेणे, बाधीत पाणीपुरवठा योजनेची दुरुस्ती करणे, विहिरीतील गाळ काढणे, गरजेनुसार खासगी विहिरींचे अधिग्रहण करणे तसेच टंचाईग्रस्त भागात टँकरद्वारे पाणी पुरवठ्याचे नियोजन करणे, अशा उपाययोजना वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश आमदारांनी दिले. गावासह शाळा, अंगणवाड्या, आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही प्राधान्याने सोडविण्याचे निर्देश दिले. आगामी उन्हाळ्यात जनावरांसाठी चारा उपलब्धता आणि चारा लागवडीचे नियोजन करण्याबाबतही संबंधित विभागांना मार्गदर्शन केले. पाणीटंचाईचा प्रश्न उन्हाळ्यापुर्वीच निर्माण झालाय. उन्हाळ्यात आणखी पाणी प्रश्न गंभीर होण्याची शक्यता लक्षात घेऊन ऐन वेळी धावपळ करण्यापेक्षा संभाव्य टंचाईचा आधीच अंदाज घेऊन आवश्यक कामे पूर्ण करणे गरजेचे आहे. त्यामुळे सर्व विभागांनी परस्पर समन्वय ठेवून वेळेत कार्यवाही करावी. ग्रामपंचायतींनी गावातील पाण्याचे स्रोत, उपलब्ध पाणी आणि संभाव्य टंचाईची वस्तुस्थितीचे प्रस्ताव पंचायत समितीकडे तातडीने सादर करण्याचे आवाहनही आ. केराम यांनी केले. स्थानिक जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग प्रशासनाच्या वतीने कागदी घोडे नाचवून लोकांची दिशाभूल केली जात आहे. नळयोजनांच्या कामाला अपुरा निधी दिल्याने कामे सुद्धा अर्धवटच झाल्याचे सांगताहेत. मात्र वस्तुस्थिती काही वेगळीच आहे. पुरक प्रमाणावर दिलेल्या निधीत काम पूर्ण झाल्यानंतरही गाव नळयोजनेच्या पाण्यापासून वंचित ठेवले आहे. याला जबाबदार कोण असा नागरिकांचा सवाल आहे. बैठकीस तहसीलदार शारदा चोंडेकर, नायब तहसीलदार रफिक मोहम्मद, गटविकास अधिकारी जयश्री वाघमारे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.के.पी.गायकवाड, विविध विभागांचे अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे अभियंते, पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी, बहूतांश सरपंच आणि ग्रामपंचायत अधिकारी उपस्थित होते. बैठकीचे प्रास्ताविक उपविभागीय अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे संतोष बघेले यांनी तर गटविकास अधिकारी जयश्री वाघमारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

महिलेच्या पर्समधील दागिणे लंपास

नांदेड/प्रतिनिधी-एका महिलेच्या पर्समधील २ लाख १८ हजार रुपये किंमतीचे दागिणे प्रवासा दरम्यान लंपास झाल्याची घटना सोमवारी घडली आहे.

मोहम्मद शफीक अब्दुल रज्जाक (वय ३९) रा.हैदरबाग, नांदेड यांच्या पत्नीने सोमवारी पूर्णा रेल्वेस्थानका ते नांदेड रेल्वे स्थानक असा रेल्वेने प्रवास केला. त्यानंतर ऑटोने हैदरबाग येथील निवासस्थानी पोहचले. या प्रवासा दरम्यान मोहम्मद शफीक यांच्या पत्नीच्या पर्समधील २ लाख १८ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिणे चोरट्यांनी चोरुन नेले आहेत. मो.शफीक यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन इतवारा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस जमादार जावेद हे करीत आहेत.

बाळासाहेब ठाकरेंचा फोटो फाडल्याच्या निषेधार्थ ठाकरे सेनेचे आंदोलन



माहूर/प्रतिनिधी-शिवसेनाप्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो कथितरीत्या फाडल्याच्या घटनेचे पडसाद आता माहूर तालुक्यातही उमटू लागले आहेत. मुंबई येथे शिवसेनेच्या प्रवक्त्या शायना एनसी यांच्याविरोधात ठाकरे गटाच्या नेत्यांनी घोषणाबाजी करत निषेध नोंदविल्यानंतर माहूरमधील शिवसैनिकही आक्रमक झाले आहेत. या घटनेच्या निषेधार्थ १८ नोव्हेंबर रोजी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी माहूर पोलीस ठाण्यावर धडक देत आंदोलन केले.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे लाखो शिवसैनिकांचे श्रद्धास्थान असून त्यांच्या विचारांवर आणि नेतृत्वावर असंख्य शिवसैनिकांची निष्ठा आहे. अशा परिस्थितीत त्यांचा फोटो फाडल्याची कथित घटना अत्यंत निषेधार्ह असल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. संबंधित घटनेची गंभीर दखल घेऊन शायना एनसी यांच्याविरोधात तातडीने कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.यासंदर्भात शिवसेनेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी पोलीस निरीक्षकांना निवेदन देण्यात आले. निवेदनात संबंधित प्रकरणी केवळ एनसी नोंदवून न थांबता कायद्यानुसार गुन्हा दाखल करावा आणि दाखल केलेल्या एफआयआरची प्रत तात्काळ द्यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली. तसेच या प्रकरणात संबंधितांवर कायदेशीर कारवाई करून अटक करावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी युवा सेना जिल्हाप्रमुख यश खराटे, शिवसेना तालुकाप्रमुख जितू चोले, शिवसेना शहरप्रमुख बालाजी वाघमारे यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते. बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचा अवमान सहन केला जाणार नाही, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली.

उमरखेडमधील अनधिकृत ले-आऊट प्रकरण आता आयुक्तांच्या दरबारात

१८ जणांवर गुन्हे,बाकीच्यांना अभय का?



उमरखेड/प्रतिनिधी-उमरखेड नगरपरिषदेच्या खंड क्र.१ व २ मधील आरक्षित जागा, ग्रीन झोन, कृषी व प्रतिबंधित क्षेत्रात सुरू असलेल्या अनधिकृत ले-आऊट, प्लॉट पाडणी आणि बांधकामांचा मुद्दा आता विभागीय आयुक्तांपर्यंत पोहोचला आहे.

उमरखेड येथील पत्रकार व माहिती अधिकार कार्यकर्ते, शेख इरफान शेख ईसा यांनी दि.१२ नोव्हेंबर रोजी अमरावतीच्या विभागीय आयुक्तांकडे अंतिम तक्रार निवेदन सादर करत स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे.यापूर्वी या प्रकरणात १८ व्यक्तींविरुद्ध उमरखेड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल झाले आहेत. मात्र उर्वरित संशयित ले-आऊटधारक आणि ग्रीन झोनमधील बांधकामांवर कारवाई का होत नाही? सर्वांना समान निकष का लावले जात नाहीत? असा थेट सवाल निवेदनात उपस्थित करण्यात आला आहे. मुख्याधिकारी अजय कुरवाडे आणि नगररचना विभागाचे नितीन अग्रवाल यांच्याकडेही वेळोवेळी पाठपुरावा केल्याचे निवेदनात नमूद आहे.महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ४३, ४४, ४५, ५२, ५३, ५४ व ५६ तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील तरतुदींनुसार संशयित ले-आऊट व बांधकामांची अभिलेखाधारित तपासणी करून, अनधिकृत विकास सिद्ध झाल्यास कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.दोषी ले-आऊटधारकांसह जबाबदार अधिकाऱ्यांवर विभागीय व कायदेशीर कारवाई करावी, अन्यथा नगरविकास व महसूल विभागासह सक्षम न्यायिक प्राधिकरणांकडे दाद मागण्याचा इशारा शेख इरफान शेख ईसा यांनी दिला आहे.

जि.प.मधील प्रशासकीय राजवटीमुळे विकास कामांचा खेळखंडोबा

नरसिंग अन्नमवार

देगलूर-जिल्हा परिषद म्हणजे ग्रामीण भागाचे मिनी मंत्रालय, मात्र या मिनी मंत्रालयाचा लोकप्रतिनिधींचा कार्यकाळ संपल्यानंतर प्रशासकीय राजवट सुरू झाली. निवडून दिलेले प्रतिनिधी नसल्याने गावागावातील समस्या मांडण्यासाठी आणि विकास कामांचा पाठपुरावा करण्यासाठी प्रभावी राजकीय व्यासपीठाचा उरलेले नाही. ग्रामपंचायत असो अथवा जिल्हा परिषद, अनेक ठिकाणी प्रशासकीय कारभारांचा अनुभव घेताना सामान्य नागरिकांना अडचणीचा सामना करावा लागत आहे.

अधिकाऱ्यांच्या कामकाजावर लोकप्रतिनिधींचा अंकुश नसल्याने ही बाब लोकशाहीसाठी घातक असून गाव तेथे विकास कामांचा खेळखंडोबा होऊन ग्रामीण विकासाचा वेग मंदावल्यांची भावना जनतेतून व्यक्त होत आहे. दरम्यान, यंदाच्या दुष्काळी परिस्थितीने देगलूर तालुक्यातील शेतकऱ्यांची आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे. दिवाळीत अनेक कुटुंबांना मुलाबाळांसाठी नवीन कपडे घेणे कठीण झाले. बळीराजा आर्थिक संकटात असताना सरकारी मदतीबाबतच्या अपेक्षा पूर्ण न झाल्याने नाराजीचा सूर आहे. अशावेळी जनतेच्या अडचणीमध्ये सहभागी होऊन त्यांना आधार देण्याची जबाबदारी राजकीय नेतृत्वाची असताना इच्छुकांची अनुपस्थिती चर्चेचा विषय ठरत आहे. विशेषत: सात वर्षापासून लोकप्रतिनिधींचा वनवास आणि जिल्हा परिषदेवर प्रशासकीय राजवट सुरू असताना ग्रामीण विकासाचा राडा मात्र रुतून बसला आहे. जनतेचे प्रश्न ऐकून घेण्यासाठी लोकप्रतिनिधी नाहीत आणि अधिकाऱ्यावर अंकुश ठेवण्यात यंत्र नाही निष्प्रभ्र ठरत असल्याची भावना आहे. अशा परिस्थितीत निवडणुकीच्या काळात बॅनरबाजी, प्रसिद्धी आणि शक्ती प्रदर्शन करणारे देगलूर तालुक्यातील चारही जिल्हा परिषद सर्कल मधील इच्छुक आता जनतेच्या संकटात कुठे आहेत? निवडणुकीच्या तोंडावर मतदारांच्या दारात हजेरी लावणाऱ्या या इच्छुकांना यावेळी जनता जाब विचारणार की पुन्हा त्यांच्या आश्वासनांना बोलणार?

निवडणुकीची चाहूल लागली की, राजकीय नेत्यांची वाढदिवस, शुभेच्छांचे बॅनर, सोशल मीडियावरील पोस्ट आणि कार्यकर्त्यांच्या फौज अचानक सक्रिय होतात. प्रत्येक कार्यक्रमात हजेरी लावून जनतेशी चवळीक साधण्याची धडपड सुरू होते. मात्र आज ग्रामीण भागात दुष्काळाचे सावट, शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी, बेरोजगारी, रस्ते, पाणी आणि मूलभूत सुविधांचे प्रश्न गंभीर असताना या इच्छुकांचा जनतेशी असलेला संपर्क नेमका कुठे हरवला? असा प्रश्न उपस्थित होत आहे. अशा परिस्थितीत जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायतीवरील परिस्थितीत जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायत प्रशासकीय राजवट संपून लोकप्रतिनिधीच्या माध्यमातून पुन्हा लोकशाहीचा कारभार सुरू होणे ही काळाची गरज बनली आहे. आगामी निवडणुकीत विकासाच्या गप्पा मारणारे इच्छुकांना जनतेच्या प्रश्नांची उत्तरे द्यावी लागणार आहेत. केवळ निवडणुकीपुरती जनतेच्या दारात जाणारे नेतृत्व आणि प्रत्यक्ष संकटाच्या काळात जनतेसोबत उभे राहणारे नेतृत्व, यातील फरक मतदार ओळखणार का? यावरच देगलूर तालुक्यातील आगामी राजकीय समीकरणांची दिशा ठरणार आहे.

भाजपचा शिंदे सेनेला दणका;माजी आ.वनगा भाजपमध्ये

पालघर:पालघर जिल्ह्याच्या राजकारणात गुरुवारी महत्त्वाची राजकीय घडामोड घडली. शिवसेनेच्या शिंदे गटाचे माजी आ.श्रीनिवास वनगा यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत खासदार क्रीडा महोत्सवाच्या कार्यक्रमादरम्यान हा पक्षप्रवेश झाला. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत उमेदवारी न मिळाल्याने शिंदे गटावर नाराज असलेले वनगा आता भाजपमध्ये दाखल झाल्याने पालघर जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे.

श्रीनिवास वनगा हे पालघर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार असून, जिल्ह्याच्या राजकारणात त्यांचे महत्त्वाचे स्थान राहिले आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत ते शिवसेनेच्या तिकिटावर निवडून आले होते. शिवसेनेत फूट पडल्यानंतर त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गटाला साथ दिली. मात्र, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत पक्षाकडून उमेदवारी नाकारण्यात आल्याने त्यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली होती. त्यावेळी त्यांनी पक्षनेतृत्वाविरोधात भूमिका घेतल्याने राजकीय वर्तुळात मोठी चर्चा झाली होती.उमेदवारीच्या मुद्द्यावरून निर्माण झालेल्या नाराजीनंतर वनगा पक्षाच्या राजकीय घडामोडींपासून दूर असल्याचे चित्र होते. त्यानंतर त्यांच्या पुढील राजकीय भूमिकेबाबत विविध चर्चा सुरू होत्या. अखेर गुरुवारी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. खासदार क्रीडा महोत्सवाच्या निमित्ताने चव्हाण पालघर दौऱ्यावर आले असताना हा पक्षप्रवेश पार पडला.या पक्षप्रवेशानंतर वनगा यांनी भाजपमध्ये कोणत्याही पदाची अपेक्षा नसून सामान्य कार्यकर्ता म्हणून पक्षाचे काम करण्याची भूमिका व्यक्त केली. कुटुंबीय आणि कार्यकर्त्यांची इच्छा असल्याने आपण पुन्हा स्वगृही परतत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. तसेच काही राजकीय घडामोडींमुळे आपण भरकटलो होतो, असेही त्यांनी नमूद केले.

गोरगरिबांच्या ताटात निकृष्ट गहू;जनावरेही खाणार नाहीत असा धान्य पुरवठा

रेशन कार्ड धारक लाभार्थ्यांचा संताप

उमरखेड/प्रतिनिधी-सार्वजनिक वितरण प्रणालीतून रास्तभाव दुकानातून वाटप होणारे धान्य अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. दिवाळीसाठी आलेले धान्य आतापर्यंत ७६ टक्के वाटप झाले असून उर्वरित वाटप सुरू आहे. मात्र, वाटप होत असलेला गहू इतका निकृष्ट होता की, तो जनावरांनाही खाण्यायोग्य नव्हता, अशी संतप्त प्रतिक्रिया आता लाभार्थ्यांकडून व्यक्त होत आहे.

रेशन कार्डधारकांना पोषकतत्त्वे विरहित, निकृष्ट दर्जाचा माल मिळत असल्याचा गंभीर आरोप होत असून, धान्य खरेदीसाठी जबाबदार असलेल्या यंत्रणेवरच आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ऐन दिवाळीच्या तोंडावर असे निकृष्ट धान्य लाभार्थ्यांच्या माथी मारले जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. वाटप केलेल्या गव्हाच्या गोण्यांमध्ये स्वच्छ धान्याऐवजी मातीचे काळे खडे, गव्हाचा भुसा, काड्या आणि बारीक कचरा मोठ्या प्रमाणात आढळून येत आहे. मजबुरीने गोरगरिबांना हाच गहू आपल्या चिमुकल्यांना खाऊ घालावा लागत असल्याचे विदारक चित्र आहे. गोरगरिबांच्या आरोग्याशी खेळणारा हा प्रकार कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे, असा सवाल उपस्थित होत असून, संपूर्ण तालुक्यात वितरणाची जबाबदारी असलेले तहसीलदार, पुरवठा निरीक्षक याकडे दुर्लक्ष का करतात? असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. सदर गंभीर प्रकाराची तात्काळ दखल घेणे अपेक्षित असताना अद्यापही ठोस कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेवरच संशय व्यक्त केला जात आहे. उमरखेड तालुक्यात १३९ स्वस्त धान्य राशन विक्रीचे दुकाने असून यामध्ये बचत गट व सोसायटी संस्थेमार्फत चालणारी एकूण १९ स्वस्त धान्य दुकाने आहेत. मात्र, जानेवारीनंतर अनेक महिन्यांचे कमिशन दुकानदारांना मिळालेले नाही. त्यामुळे दुकानदार अडचणीत सापडले असून, ही बाब उघडपणे बोलण्यास ते टाळत आहेत.

सदर प्रतिनिधीशी बोलतांना उमरखेड तहसील कार्यालयाचे पुरवठा निरीक्षक महाजन यांनी स्पष्ट केली की, आमच्याकडे आतापर्यंत अशी कुठल्याही प्रकारची लाभार्थ्यांची तक्रार अद्याप आलेली नाही, एक-दोन कट्टे निकृष्ट दर्जाचे धान्य आढळून आलेच तर, गोदामातून रेशनचे धान्य नेताना दुकानदारांना जर असे निकृष्ट दर्जाचे धान्य आढळून आले, जे लाभार्थ्यांना देणे योग्य नाही, तर ते धान्य त्याच महिन्यात जसेच्या तसेच परत गोदामाला आणून जमा करण्याची आणि त्याच्या बदल्यात आपल्याकडे आलेल्या नवीन स्टॉकमधील धान्य रिप्लेस करून परत घेऊन जाण्याची मुभा रेशन विक्रेत्या दुकानदारांना आम्ही दिलेली आहे. परंतु रेशन दुकानदारांनी ही बाब आम्हाला कळवावी. त्यांनी कळविलेच नाही तर आम्हाला कसे समजेल? असे पुरवठा निरीक्षक महाजन यांनी सांगितले.

लालसिंघ सपुरे यांचे निधन



नांदेड/प्रतिनिधी-स्टेट बँक ऑफ़ इंडियाचे सेवानिवृत्त रोखपाल आणी सामाजिक कार्यकर्ता स.लालसिंघ सपुरे त्रिकुटवाले (वय ७९) यांचे बुधवार दि. १८ नोव्हेंबर रोजी दुपारी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गुरुवार दि. १९ रोजी सकाळी ११.३० वाजता नगीनाघाट स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मीत जत्थेदार संतबाबा ज्योतिन्दरसिंघजी, मीत ग्रंथी संतबाबा गुरमीतसिंघजी आणि प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलं, तीन मुलीं, सुनं, जावई, नातवंड असा मोठा परिवार आहे.

सौ.शोभा चौहान यांचे निधन



नांदेड/प्रतिनिधी-शहरातील दिलीपसिंघ कॉलनी गोवर्धनघाट भागातील रहिवासी व अन्नपूर्णा माता मंदिर जानापुरीच्या विश्वस्त सौ.शोभा गुरुसिंह चौहान यांचे अल्पशा आजाराने दि. १९ नोव्हेंबर रोजी निधन झाले. त्या ५७ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, मुलगी, जावई असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी शांतीधाम स्मशानभूमी गोवर्धनघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी प्रतिष्ठीत नागरिक व नातेवाईक उपस्थित होते.

महामंडळ नियुक्त्या १५ डिसेंबरपर्यंत-ना.भुजबळांचे संकेत

मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील विविध महामंडळाचे महायुतीतील घटक पक्षातंर्गत वाटप येत्या १५ डिसेंबरपर्यंत महामंडळांवरील जास्तीत जास्त नियुक्त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न असल्याचे स्पष्ट संकेत राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा मंत्री छगन भुजबळ यांनी दिले. त्यामुळे महायुतीतील इच्छुक पदाधिकारी आणि नेत्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत.महायुतीतील घटक पक्षांमधील अंतर्गत मतभेद आणि वाटपाच्या तिढ्यामुळे गेल्या काही वर्षांपासून रखडलेल्या शासकीय महामंडळांवरील नियुक्त्यांना आता मुहूर्त मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शिवसेनेचे मंत्री दादाजी भुसे यांच्या शासकीय निवासस्थानी १८ नोव्हेंबर रोजी महायुतीच्या समन्वय समितीची बैठक पार पडली. समन्वय समितीचे अध्यक्ष तथा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीला मंत्री गिरीश महाजन, दादाजी भुसे, छगन भुजबळ, हसन मुश्रीफ यांच्यासह महायुतीचे प्रमुख नेते उपस्थित होते.

पान १ वरुन

दादर रेल्वे नव्हे,मेट्रो स्थानकाचे...

समितीबाबत केंद्राकडून मार्गदर्शन प्राप्त दादर मेट्रो स्थानकाला चैत्यभूमी नाव देण्याच्या मागणीसंदर्भात राज्य सरकारने यापूर्वीच तत्त्वतः मान्यता देऊन केंद्र सरकारला पत्र पाठवले आहे. मात्र, या प्रक्रियेसाठी विधानमंडळाच्या समितीबाबत केंद्राकडून मार्गदर्शन प्राप्त झाले आहे. त्यामुळे विधिमंडळाच्या अधिवेशनात आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली जाईल. त्यानंतर स्थानकाचे नामकरण करण्यात येईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या...

रवाना झाले. एकनाथ शिंदे यांचं हेलिकॉप्टर बंद पडल्यानं त्यांनी रस्त्यानं प्रवास करत सोलापूरला जाण्याचा निर्णय घेतला आहे. हेलिकॉप्टर तांत्रिक दुरुस्ती न झाल्यानं एकनाथ शिंदे यांना रस्ते मार्गानं पुण्याकडे जावं लागलं आहे. कार्तिकी एकादशीच्या निमित्तानं पाहणी करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पंढरपूरमध्ये दाखल झाले होते. एकनाथ शिंदे मुंबईसाठी रवाना होत असताना हेलिकॉप्टरमध्ये काही बिघाड झाला. हेलिकॉप्टरचं दुसरं इंजिन चालू होतं नव्हतं. पोलिसांनी आणि जिल्हाधिकाऱ्यांनी कोणताही धोका न पत्करता रस्ते मार्गानं प्रवास करावा असा आग्रह एकनाथ शिंदे यांना केला. त्यानुसार एकनाथ शिंदे यांनी रस्ते मार्गानं जाण्याचा निर्णय घेतला.

माहूरच्या पाणीप्रश्नासाठी...

नदीपात्रात तातडीने पाणी सोडण्यात यावे, अशी आग्रही मागणी त्यांनी केली. यासोबतच अपर जिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सद्यस्थितीची माहिती दिली व पाणी सोडण्याबाबत सविस्तर चर्चा केली. तसेच या मागणीवर तातडीने सकारात्मक कार्यवाही करण्याची विनंती केली.वेणी धरणातून पैनगंगा नदीपात्रात पाण्याचे एक आवर्तन सोडण्यात आल्यास माहूर शहराच्या पुढील तीन ते चार महिन्यांच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागू शकतो, असा विश्वास नगराध्यक्षांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे यवतमाळ जिल्हा प्रशासनाने या मागणीचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.माहूरकरांची तहान भागविण्यासोबतच देशभरातून येणाऱ्या भाविकांची पाण्याअभावी गैरसोय होऊ नये, यासाठी नगरपंचायत प्रशासन प्रयत्नशील असून, माहूरचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक त्या स्तरावर पाठपुरावा सुरू असल्याचे नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी स्पष्ट केले.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४